Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# लालबहादुर शास्त्री जीवन परिचय, कार्य आणि विचार

**भारद्वाज अनुराधा संजय**
संशोधक
banuradha42@gmail.com
Mob. 9404506328

**प्रस्तावना :**

भारताचें माजी पंतप्रधात, शांतीचे देवता, निष्कलंक चारित्र्याचे प्रतीक लालबहादुर शास्त्री यांचा जन्म उत्तर प्रदेशात गंगेच्या काठावारील मुगलसराय या गावी २ ऑक्टोंबर १९०४ मध्ये झाला. अत्यंत गरीब परीस्थितीत शिक्षण मिळवून त्यांनी काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी मिळवली. १९२७ मध्ये लाला लजपत राय यांनी स्थापन केलेल्या 'द सर्व्हट्स ऑफ द पिपल सोसायटी' चे ते सदस्य झाले. १९२९ पासून ते नेहरुंच्या सहवासात आले आणि देशाच्या सर्वोच्च राजकीय वर्तुळात त्यांचा समावेश झाला. महात्मा गांधीच्या स्वातंत्र्यालढ्याच्या सत्याग्रहात त्यानी भाग घेतला. त्यांनी नऊ वर्षे तुरुंगात काढली.

साधी राहणी, उच्च विचारसरणी, सतशील व निरिच्छ वृत्ती आणि स्पष्टवक्तेपणा यांमुळे अनेकांचा त्यांनी विश्वास संपादन केला. भारत - पाक युद्धाच्या वेळी त्यांच्या राष्ट्रीय अस्मितेचे आणि कणखर धोरणाचे दर्शन जगाला घडले. त्यांची जय जवान, जय किसान ही अर्थपूर्ण घोषणा पुढे अमर झाली.

**संशोधनाची उिद्दष्ट्ये :**

१) लालबहादूर शास्त्री यांचया राजकीय विचारांचा अभ्यास करणे.
२) लालबहादूर शास्त्री यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.
३) लालबहादूर शास्त्री यांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.
४) लालबहादूर शास्त्री यांच्या शेती विषयक विचारांचा अभ्यास करणे.
५) लालाबहादूर शास्त्री यांच्या संरक्षण क्षेत्रातील विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम संकलन पद्धतीचा वापर करून माहिती संकलित केलेली आहे. तसेच वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादी माध्यमांचा आधार घेताला जाणार आहे.

**अभ्यास विषयाचे महत्त्व :**

सदर संशोधनासाठी लालबहादूर शास्त्री जीवन परिचय, कार्य आणि विचार हा विषय निवडला आहे. यामध्ये लालबहादूर शास्त्री यांचे राजकीय, सामाजिक, आर्थिक, शेती आणि संरक्षण क्षेत्रातील विचारांचा अभ्यास केलेला आहे.

**लालबहादूर शास्त्री यांचे राजकीय विचार :**

भारताच्या स्वातंत्र्यानंतर लालबहादूर शास्त्री यांना उत्तर प्रदेशाच्या संसद चे सचित बनवण्यात आले. १९४६ मध्ये त्यांना पोलिस आणि वाहतूक परिवहन मंत्रीही बनवण्यात आले. १९४६ मध्ये त्यांना भारताचे पंतप्रधान म्हणून निवडण्यात आले त्यांची स्वातंत्र्य लढ्यातील कारकीर्द थोर स्वातंत्र्य सैनिकाप्रमाणे होती. त्याच प्रमाणे लालबहादूर शास्त्री यांनी राजनेता म्हणून आपल्या कुशाग्र बुद्धिमता

आणि तर्कज्ञानाच्या बळावर संकटा प्रसंगी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन देशाचे संरक्षण केले. त्यांनी आपल्या राजनीतिक जीवनांत देशाला हरित क्रांती आणि औद्योगिकीकरणाच्या मार्गावार नेल, "देशाप्रती प्रत्येक रस्ता सरळ आणि स्पष्ट आहे. आमच्या देशांतील प्रत्येक व्यक्तींना स्वातंत्र्य आणि समृद्धीसोबतच समाजवादी लोकतंत्राची स्थापना करणे आणि जागातील सर्व देशांसोबत विश्व शांती आणि मित्रतेचे संबेध राखणे" असे ते आपल्या भाषणात विचार मांडत त्यांचे विचार समाजवादी आणि अहिंसा वादी होते.

**लालबहादूर शास्त्री यांचे आर्थिक विचार :**

लालबहादुर शास्त्री यांनी देशांत दुध उत्पादनाला चालना देण्यासाठी त्यांनी श्वेत क्रांतीला पाठिंबा दर्शविला. त्याचप्रमाणे त्यांनी स्वदेशी उद्योगांना प्रोत्साहन देऊन देशाला औद्योगिकरणाच्या मार्गावन नेले. आणि देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्यावर भर दिला. लालाबहादूर शास्त्री यांच्या मते "सत्याचा मार्गे जरी कठीण आणि लांब असला तरी तोच मार्ग आपल्या जीवनांत आनंद घेऊन येतो."

**लालबहादूर शास्त्री यांचे सामाजिक विचार :**

अलाहाबाद येथे वास्तव्य असताना लालबहादूर शास्त्री यांना पंडित नेहरूंचे मार्गदर्शन लाभले. सामाजिक पातळीवर अनेक संस्था आणि सरकारी कार्यालयात त्यांनी काम पाहिले. लालबहादूरांनी केलेली सेवा ही प्रत्ये वेळी योग्यच ठरली. अनेक सामाजिक सेवाभावी संस्थांत विनावेतन किंवा गरजेपूरता अल्प मोबदला घेऊन काम केले. पैशांच्या श्रीमंतीपेक्षा त्यांची साधी राहणी आणि शांततापूर्ण जीवनावर जास्त भर होता. "संविधानाने दिलेल्या कायद्यांचा नेहमी सम्मान केला पाहिजे. ज्यामुळे आपल्या लोकशाहीची मुलभूत रचना टिकून राहील आणि मजबूत बनेल. "त्यांना गुलामगिरी मान्य नव्हती. ब्रिटीशांच्या राजवटीपासून आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता आपले सर्वस्व अर्पण करणाया थोर स्वातंत्र्य सैनिकांपैकी लालबहादूर शास्त्री हे देखील थोंर क्रांतीकार होते.

लाल बहादूर शास्त्री यांचे शेती विषयक विचार :

लालबहादूर शास्त्री जेव्हा देशाच्या पंतप्रधान पदी विराजमान झाले होते तेव्हा देशात खूप बिकट परिस्थिती पसरली होती. त्यावेळेस देशात खाण्या पिण्याच्या गोष्टी आयात केल्या जात. याकरिता आपला देश नॉर्थ अमेरिकेतून येणाया धान्यावर पुर्णत : अवलबूंन होता. भारत पाक युद्धाच्या वेळी देशात सर्वत्र कोरडा दुष्काळ पडला होता. लोक अन्न पाण्यासाठी त्रासून गेले होते. देशातील लोकांची परिस्थिती पाहता शास्त्री यांनी लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी ‘जय जवान जय किसान‘ हा बहुमुल्य नारा दिला. जो कालांतराने खूप प्रसिद्ध झाला. "सैनिकांच्या दृष्टिकोनातून आणि आर्थिक दृष्टिकोनातून भारत मजबूत होईल, तो त्याचा सर्व गरजा पूर्ण करण्यास सक्षम असेल. मग त्यामुळे आपला भारत देश एक मजबूत राष्ट्र बनेल. "असे त्यांचे विचार होते.

**लालबहादूर शास्त्री यांचे संरक्षण क्षेत्रातील विचार :**

गृहमंत्री म्हणून त्यांनी देशाच्या सुरक्षे संबंधित अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. सन १९६२ साली झालेल्या चीन युद्धा दरम्यान त्यांनी देशांतर्गत सुरक्षा कायम राखण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली. सन १९६५ साली झालेल्या भारत पाक युद्धाच्या वेळी त्यांनी आपल्या कुशल रणनीतीच्या बळावर देशात शांतता कायम ठेवली. तथापि "भारत हे युद्धखोर, साम्राज्यवादी राष्ट्र नसून शांततापूर्ण सहजीवनाचं तत्व अंगीकारणारा देश असल्याचा संदेश ताश्कंद करारावर सही करून शास्त्रीजींनी साया जगाला दिला. शास्त्रीजींनी भारत आणि पाकिस्तान दरम्यान १९६५ च्या युद्धादरम्यान "जय जवान जय किसान" हा नारा दिला होता या घोषणाला देशाचे राष्ट्रीय घोषण असेही म्हटले जाते.

**निष्कर्ष :**

१. लालबहादुर शास्त्री यांचे राष्ट्र आणि राष्ट्रवाद संबंधीचे विचार सर्वसामान्य व वास्तवादी आहेत.
२. लालबहादूर शास्त्री एक निष्ठावंत सत्यवादी कार्यकर्ते होते तसेच राष्ट्राला त्यांनी अहिंसेचा मार्ग दाखवला.
३. लालबहादूर शास्त्री यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय एक्य असणारा राष्ट्रवाद अपेक्षित होता.
४. लालबहादूर शास्त्री यांनी किसान आणि जवान यांना आर्थिक दृष्ट्या आणि संरक्षणात्मक दृष्ट्या देशाचा पाया मानला.

**संदर्भ :**

१. हिंदू जनजागृती
२. महाराष्ट्र टाईम्स
३. लोकसत्ता
४. विकिपिडीया
५. मराठी विश्वकोश